सत्यं शिवं सुंदरम्    दिनांकः- ९.४.२००६

श्री. हावगीस्वामी महाविद्यालय उदगीर

एम.ए. व्दितीय वर्ष(मराठी)

शैक्षणिक वर्ष 2005-2006

## 'अभिप्राय'



प्रति,
प्रा.म.ई.तंगावार
मराठी विभाग

आदरणीय सर,

आपण खुप सुदैवी आहात कारण तुम्ही खुप कमी वयामध्ये उत्कृष्ट अशी कामगिरी केलात. याला नशीब म्हणून चालत नाही. तर ते तुमचे प्रयत्न आहेत. कठिण परिश्रमाचे फळ आहे. त्याबद्दल तुमचे कौतुक केले तेवढे कमीच आहे.

① सर तुम्ही शिकवताना विषयाच्या बाहेर न जाता विषयातीलच उदाहरणे देऊन सुद्धा स्पष्ट करणे, मोजके पणाने नमुद करणे हे खरच कौतुकास्पद आहे. या मोजकेपणानेच तुमचा तास केव्हा संपला हे आम्हाला समजत नसे. तसेच ② तुम्ही शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील नाते खुप दुरचे व खुपच जवळचे असू नये असेच ठेवलात. ③ विद्यार्थ्यांना वेळोवेळी जाणीव करुन देणे व योग्य मार्गदर्शन करणे हा देखील गुण कौतुकास्पद आहे. ④ सर तुम्ही खरच विद्यार्थ्यांचे जाणते व त्यांच्या परिस्थितीचेही जाणते आहात. ⑤ इतर सरांप्रमाणे मुलं-मुली किंवा जातीभेद तुम्ही कधीच केला नाहीत. ⑥ विद्यार्थी विषयी तळमळ आहे म्हणूनच तुम्ही कोणतेही पुस्तक उपलब्ध करता. ⑦ परिस्थिती अनुरूप तुमचे वर्तन असते ⑧ सर तुम्ही नेहमीच दुसऱ्याच्या वाटाड्या बनण्याचा प्रयत्न करता.

सर तुमच्या व्यक्तिमत्वामध्ये यापेक्षाही अनेक सुप्त गुण आहेत. तुमच्यासारख्या सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्वात दोष आढळणं खरच दुर्मिळ आहे. पण माझ्या परीने एक-दोन सांगू इच्छितो त्याबद्दल मला क्षमा करावी.

(1) सर तुम्ही वर्गात कधीच विनोद निर्मिती करत नाही. अधुन-मधुन जर विनोद निर्मिती झाली तर तास अधिक चांगला होईल.

(2) तुमच्या शिकवण्यात व दिलेल्या लेखनात थोडासा विस्तृतपणा देखील असावा असं मला वाटतयं.

थोपेक्षा दुसरे दोष असतील असं मलातरी वाटत नाही. सर मी तुमच्या मुळेच एम.ए.ला प्रवेश घेतला होता, पण द्वितीय वर्षात तुम्ही आम्हाला शिकवायला नव्हता, ही एक खंत मनात राहून गेली. तरी-देखील तुम्ही मला प्रकल्प लेखनात खुप मदत केली. तुमच्या मुळेच आज माझा प्रकल्प तयार झाला. त्याबद्दल मी तुमचा शतशः ऋणी आहे.

सर तुम्ही तुमच्या विषयात पारंगत आहात म्हणून एक 'आदर्श व्याख्याते' असं मला म्हणावंसं वाटतय. तुम्ही आमच्यासाठीच 5.00 वाजेपर्यंत महाविद्यालयात थांबता. म्हणून 'जनसेवा हीच ईश्वर सेवा' हा गुण तुमच्यातला दिसुन येतो.

सर, फक्त अभिप्राय देऊन तुमच्या बद्दलची असलेली सहानुभूती, आदरभाव, आपुलकी, भागणार नाही तर प्रत्यक्ष तुमच्याशी थोडावेळ संवाद साधून तुम्हाला जीवनात काय बनायचे होतं? किंवा जीवनाकडे बघण्याचा तुमचा दृष्टीकोन काय आहे? हे जाणून घ्यायचे आहे.

तुम्ही मला कॉलेज संपल्यावर ही शैक्षणीक अडचणीत मदत कराल अशी अपेक्षा करतो. तसेच सर लग्नाची पत्रिका द्यायला विसरु नका. मी येण्यासाठी खुप उत्सुक आहे. तसेच दोन वर्षात काही चुका झाल्या असतील तर विद्यार्थी म्हणून किंवा एक लहान भाऊ समजुन माफ कराल अशी अपेक्षा करतो.


पत्ता

नाव :→ धोगरे प्रमोद दत्तात्रय.
मु. खरबवाडी (गुरधाळ) पो. तळेगाव,
ता. देवणी. जि. लातूर.
फोन. नं. 223739.